RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १५१(२)] शुक्रवार, ऑक्टोबर १७, २०२५/आश्विन २५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३८६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५.

सूचना

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.

क्रमांक प्राफेब-२०२५/ प्र.क्र.१४०/ पुनर्रचना(म-१०).— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) च्या कलम- ४ च्या पोट-कलम (१) चे खंड (पाच) आणि (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा पुढीलप्रमाणे मसुदा, उक्त कलम ४, च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, दिनांक १७ नोव्हेंबर,२०२५ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त मसुदा विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना जिल्हाधिकारी अहिल्यानगर, अहिल्यानगर यांच्याकडे उपरोक्त तारखेस किंवा त्यापूर्वी येतील त्या शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक प्राफेब २०२५/प्र.क्र.१४०/पुनर्रचना (म-१०).— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) च्या कलम-४ च्या पोट-कलम (१) चे खंड (पाच) आणि (सहा) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या तसेच याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करून आणि पूर्वीच्या सर्व अधिसूचना किंवा आदेश अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात समाविष्ट असलेल्या मौजे झापवाडी व मौजे घोडेगाव गावांच्या संदर्भातील जेथवर संबंधित असतील तेथवर त्यामध्ये फेरबदल करून महाराष्ट्र शासन पूर्वीच्या अधिसूचना किंवा आदेशात अंशतः बदल करून उक्त अधिनियमाच्या कलम-४ च्या पोट-कलम (४) नुसार आवश्यक पूर्व प्रसिध्दीनंतर खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यांतील नेवासा तालुक्यातील

अनुक्रमे मौजे झापवाडी व मौजे घोडेगाव यांच्या सर्व्हे नंबरमध्ये फेरबदल करून दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ पासून अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील अनुक्रमे मौजे झापवाडी येथील सोबतच्या अनुसुचीतील स्तंभ (२) मधील सर्व्हे नंबर वगळून अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील मौजे घोडेगाव गावामध्ये समाविष्ट करण्यात येईल, असे विनिर्दिष्ट करीत आहे.

अनुसूची

अ. क्र. (१)	मौजे झापवाडी तालुका - नेवासा जिल्हा – अहिल्यानगर मध्ये समावेश असलेले सर्व्हे नंबर (२)	सदर अधिसूचना निर्गमित करण्यापूर्वीचे स्तंभ (२) मध्ये दर्शविलेले सर्व्हे नंबर समावेश असलेले गाव (३)	सदर अधिसूचना निर्गमित केल्यानंतर स्तंभ (२) मध्ये दर्शविलेले सर्व्हे नंबर समावेश असलेले गाव (४)
१.	७८ ते ९९	मौजे झापवाडी	मौजे घोडेगाव

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अजित देशमुख,
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 17th October, 2025.

Notice

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No.TLC-2025/C.R.140/ Restructure (M-10).— The following draft of the notification, which the Government of Maharashtra proposes to issue in exercise of the powers conferred by clauses (*v*) and (vi) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 4, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 17th November, 2025.

2. Any objection or suggestion, which may be received by the Collector, Ahilyanagar, Ahilyanagar, from any person with respect to the said draft notification before the aforesaid date will be considered by the Government.

DRAFT NOTIFICATION

No. TLC-2025/C.R.140/ Restructure (M-10).— In exercise of the powers conferred by clauses *(v)* and *(vi)* of sub-section *(1)* of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of any previous notifications or orders issued in this behalf, in so far as they relate to the villages specified in the *Schedule* appended hereto, the Government of Maharashtra after previous publication as required by sub-section *(4)* of the said section 4, hereby alters, with effect from 17th November, 2025 the limits of village Zapwadi and Ghodegaon village in Taluka Newasa, District Ahilyanagar respectively, by excluding the Survey numbers mentioned in column *(2)* of the *Schedule* appended hereto from village Zapwadi, Taluka Newasa, District Ahilyanagar and including it in village Ghodegaon, Taluka Newasa, District Ahilyanagar.

Schedule

Sr. No. (1)	Survey numbers in Village Zapwadi, Taluka Akole, District Ahilyanagar (2)	Name of the village in which survey numbers mentioned in column *(2)* are included prior to issue of this notification. (3)	Name of the village in which survey numbers mentioned in column *(2)* are included after issue of this notification. (4)
1.	78 to 99	Zapwadi	Ghodegaon

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT DESHMUKH,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.